# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature.... साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४० वा ❑ बुधवार दि.१६ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## लाडकी बहीण योजना बंद करण्याची गरज!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्यं

मागील महायुती सरकारच्या काळातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चांगली प्रसिद्ध झाली आहे. अनेक महिलांनी त्यासाठी अर्ज केले असून, त्याचे पैसेही खात्यात आले आहेत. असे असताना आता राज्यातील लाडक्या बहिणींसाठी महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. उत्पन्नाच्या तुलनेत खर्चात वाढ झाल्यामुळे राज्याची राजकोषीय तूट २ लाख कोटींच्या पुढे गेली आहे. राज्याची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्याची चिंताही व्यक्त करण्यात येत असल्याने जनतेवर भुर्दंड लादणारी ही योजना बंद करण्याची मागणी जनमानसातून होत आहे.राज्यात विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सुरू केलेली ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'' योजना आता सरकारची डोकेदुखी ठरत असल्याचं चित्र आहे. योजनेसाठी आवश्यक निधी उभारताना शासनाची चांगलीच धावपळ सुरू असून, या योजनेसाठीच्या निधीसाठी सामाजिक न्याय विभागासह आदिवासी विकास विभागाचा निधी योजनेसाठी वळवण्यात येत असल्याने लाभार्थींना योजनेचा लाभ मिळण्यात उशीर होत असल्याने आदिवासी समुदायात असंतोष निर्माण होत आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आणलेली महायुती सरकारची लाडकी बहीण योजना ही गेम चेंजर ठरली. या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे महाराष्ट्रात पुन्हा भाजप-महायुतीची सत्ता आली. मात्र, यासोबतच या योजनेचे दुष्परिणामही समोर येत आहेत. उत्पन्नाच्या तुलनेत खर्चात वाढ झाल्यामुळे राज्याची राजकोषीय तूट २ लाख कोटींच्या पुढे गेली आहे. राज्याची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट आहे, अशी चिंता व्यक्त करत कॅगने सरकारला इशारा दिला आहे.दरम्यान, राजकोषीय तूट वाढल्याने लोकानुनय योजना आणि कल्याणकारी योजनांना कात्री लागण्याचे वा त्यातील निकष बदलण्याची टांगती तलवार आहे. तर दुसरीकडे लाडकी बहीण योजनेला पण या आर्थिक बेशिस्तीचा फटका बसण्याची शक्यता मंत्र्यांच्या वक्तव्यावरून दिसून येत आहे.

मतपेटी सुरक्षित राखण्यासाठी महायुती सरकारने ही योजना सुरू केली ..या योजनेचा मोठा फायदा सरकारला झाला.

यातील ४.७ कोटी महिला मतदार आहेत. ४.७ कोटीपैकी २.५ कोटी महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्याचं महायुती सरकारचं उद्दिष्ट आहे. यानुसार २.५ कोटी महिलांना दर महिन्याला १५०० रुपये देण्यासाठी राज्य सरकारला ४५ हजार कोटी रुपये खर्च करावे लागतील. हीच रक्कम दरमहा २१०० रुपये झाल्यास ६३ हजार कोटी रुपये खर्च करावे लागतील.

**वित्त विभागाची चिंता**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत निराशाजनक कामगिरीनंतर भाजपा, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या महायुती सरकारने सर्व विरोध आणि चिंता दुर्लक्षित करून लाडकी बहीण योजना आणली. राज्याची आर्थिक स्थिती नाजूक असल्याचा दावा करत महाराष्ट्रातील विरोधी पक्षांनी यावर चिंता व्यक्त केली होती. लाडकीचा आर्थिक भार राज्याच्या आरोग्यासाठी चांगला नसल्याचेही वित्त विभागाने म्हटले होते. आता कॅगने त्याला मंजुरी देत विरोधकांची आणि वित्त विभागाची चिंता योग्य असल्याचे म्हटले आहे.

लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर आर्थिक भार वाढल्याचा दावा कॅगच्या अहवालात करण्यात आला आहे. राज्य सरकारचे संकलन आणि खर्च यात ताळमेळ नसल्याचे कॅगने म्हटले आहे.

राज्य सरकारच्या जमा आणि खर्चात ताळमेळ नसल्याचे कॅगने म्हटले आहे. कॅगच्या अहवालात राज्याच्या तिजोरीवर आर्थिक ताण आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या अहवालात राज्याच्या आर्थिक बेशिस्तीवर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान सरकारने लाडकी बहीणची रक्कम १५०० रुपयांवरून २१०० रुपयांपर्यंत वाढवणे, शेतकऱ्यांची कर्जमाफी अशी अनेक आकर्षक आश्वासने दिली होती. मात्र, रिकाम्या तिजोरीमुळे सरकारला लाडलीसह इतर अनेक योजनांमध्ये अडचणी येत आहेत.त्यामुळे ही योजना बंद करावी,अशी मागणी होत आहे.या योजनेमुळे जनतेवर अकारण कराचा बोजा वाढत आहे.सरकारच्या फायद्यासाठी जनतेवर भुर्दंड का लादला जावा? असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे.






# 'एक जिल्हा, एक उत्पादन- २०२४' पुरस्कार; महाराष्ट्राला 'अ' श्रेणीत सुवर्णपदक

ज्योतिर्मय साहित्य

**नवी दिल्ली –** 'एक जिल्हा एक उत्पादन २०२४' अंतर्गत महाराष्ट्राने चमकदार कामगिरी केली असून राज्याला 'अ' श्रेणीतील सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. यासह रत्नागिरी, नागपूर, अमरावती, नाशिक आणि अकोला या जिल्ह्यांनी कृषी आणि गैर-कृषी क्षेत्रातील विशिष्ट उत्पादनांसाठी सुवर्ण, रौप्य, कांस्य आणि विशेष उल्लेख पुरस्कार पटकावले आहेत.




भारत मंडपममध्ये राष्ट्रीय 'एक जिल्हा, एक उत्पादन' २०२४ पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि वाणिज्य व उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद यांच्या प्रमुख उपस्थित पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्राने आपल्या उत्पादनांची नाविन्यपूर्णता, उच्च दर्जा आणि वैशिष्ट्यपूर्ण गुणवत्तेने राष्ट्रीय स्तरावर वर्चस्व प्रस्थापित केले.

'एक जिल्हा, एक उत्पादन' हा उपक्रम केंद्र शासनाचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे, ज्याचा उद्देश प्रत्येक जिल्ह्याच्या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांना प्रोत्साहन देऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे आणि जागतिक बाजारपेठेत त्यांचा ठसा उमटवणे आहे. या उपक्रमांतर्गत २०२४ च्या पुरस्कार समारंभात महाराष्ट्राने आपली उत्कृष्टता सिद्ध करून विविध श्रेणीत पुरस्कार मिळविले. हे पुरस्कार जिल्हा, राज्य आणि परदेशातील भारतीय दूतावास या तीन गटांमध्ये वितरित करण्यात आले. परदेशातील भारतीय दूतावासांनी या समारंभात दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग घेतला. राज्यांच्या 'अ' श्रेणीत महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, पंजाब आणि उत्तर प्रदेश राज्यांनीही सुवर्णपदक मिळवले आहे. राज्याच्यावतीने उद्योग संचालनालयाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंग कुशवाह यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

महाराष्ट्राने कृषी क्षेत्रात आघाडी कायम राखत विविध जिल्ह्यांच्या उत्पादनांना मान्यता मिळवली आहे. या अंतर्गत खालील जिल्ह्यांना आपल्या वैशिष्ट्पूर्ण कृषी उत्पादनांसाठी पुरस्कार पटवावले :

जागतिक स्तरावर विशेष ओळख असलेला रत्नागिरी जिल्ह्याचा हापूस आंबा यंदाही अव्वल ठरला आहे. कृषी क्षेत्रातील 'अ' श्रेणीअंतर्गत रत्नागिरी जिल्ह्याने प्रथम स्थान मिळवले आहे. हापूस आंब्याची गोड चव, उत्कृष्ट गुणवत्ता आणि जागतिक बाजारपेठेतील मागणी यामुळे रत्नागिरी जिल्ह्याला हे यश मिळाले आहे. रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंद्र सिंह यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

नागपूर जिल्ह्याच्या प्रसिद्ध संत्र्यांनी कृषी क्षेत्रातील 'अ' श्रेणीअंतर्गत द्वितीय स्थान प्राप्त केले असून नागपूर संत्र्यांनी आपल्या रसाळ चवीने आणि जागतिक दर्जाच्या गुणवत्तेने देश-विदेशात ख्याती मिळवली आहे. या यशामुळे नागपूर जिल्ह्याचा कृषी वारसा आणखी समृद्ध झाला आहे. रौप्यपदकाचा पुरस्कार नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी स्वीकारला.

अमरावती जिल्ह्याने मंदारिन संत्र्यांसाठी कृषी क्षेत्रातील 'अ' श्रेणी अंतर्गत तृतीय स्थान मिळवले. संत्रा उत्पादनातील सातत्य, गुणवत्ता आणि बागायती क्षेत्रातील उत्कृष्ट प्रयत्न यामुळे अमरावती जिल्ह्याने हे यश संपादन केले. अमरावती जिल्हा उद्योग केंद्रांचे महाव्यवस्थापक नीलेश निकम यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

नाशिक जिल्ह्याने द्राक्षे आणि मनुक्यांसाठी (ग्रेप्स अँड रेझिन्स) कृषी क्षेत्रातील श्रेणी 'अ' अंतर्गत विशेष उल्लेख पुरस्कार मिळवला. नाशिकच्या द्राक्षांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपले स्थान भक्कम केले आहे आणि या यशाने नाशिकच्या कृषी क्षेत्रातील योगदानाला मान्यता मिळाली. हा पुरस्कार नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी स्वीकारला.

अकोला जिल्ह्याने गैर-कृषी क्षेत्रातील श्रेणीतील 'ब' श्रेणी अंतर्गत कापूस जिनिंग आणि प्रेसिंगसाठी विशेष उल्लेख पुरस्कार प्राप्त केला आहे. कापूस उत्पादन आणि प्रक्रिया क्षेत्रातील अकोल्याची प्रगती आणि औद्योगिक विकास यामुळे हा पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार जिल्हा उद्योग केंद्र, अकोल्याचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड यांनी स्वीकारला.


# भारत-नामिबिया : शक्तिशाली सहकार्याचे नवयुग

ज्योतिर्मय साहित्य

**२१ वे शतक हे आशियाचे शतक आहे तसेच ते शक्तिशाली सत्ताकेंद्र म्हणून भारताचे सुद्धा शतक आहे, याची प्रचिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाच दिवसांच्या ब्राझील दौऱ्याने आली आहे. या पाच दिवसांच्या दौऱ्याचा शेवट त्यांनी आफ्रिकेतील नामिबिया या महत्त्वपूर्ण देशाच्या भेटीने केला आहे. त्यांचा हा दौरा राजकीय दृष्टीने तसेच भूराजनैतिक दृष्टीने अत्यंत यशस्वी ठरला आहे. एक तर त्यांना नामिबियातील सरकारने त्यांचा सर्वोच्च सन्मान बहाल केला आणि दुसरे म्हणजे भारत नामिबिया दरम्यान चार महत्त्वपूर्ण सामंजस्य करारांवर सह्या करण्यात आल्या. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे जगातील दक्षिणी देशांचा समर्थ व बलशाली नेता म्हणून भारताचा अभ्युदय झाला आहे, हे भारताच्या वाढत्या प्रभुत्वाचे सुचिन्ह आहे.**



दोन्ही देशांतील सहकार्य संवर्धन आणि करुणेची एक शक्तिशाली कहाणी, असे या दौऱ्याचे पंतप्रधानांनी सार्थ वर्णन केले आहे. लोकशाहीच्या मंदिरातील भाषण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नामिबियाच्या संसदेत केलेले भाषण म्हणजे त्यांच्या संसदीय लोकशाही, श्रद्धा व मूल्यांवर भर देणारे एक महत्त्वपूर्ण भाषण म्हटले पाहिजे. या भाषणामध्ये त्यांनी असे मौलिक प्रतिपादन केले की, एका सामान्य कुटुंबातील नेता असूनही त्यांची तीन वेळा देशाचे पंतप्रधान म्हणून निवड झाली, हा भारताच्या संविधानाचा शक्तिशाली चमत्कार होय. नामिबियातून भारतामध्ये नेण्यात आलेल्या चित्त्यांचा संदर्भ देऊन पंतप्रधान म्हणाले की, चित्याने तुम्हाला संदेश पाठविला असेल. सर्व काही ठीक आहे. ते आनंदी आहेत आणि त्यांनी नवीन घरात चांगल्या प्रकारे जुळवून घेतले आहे. २०२२ मध्ये नामेबियातून आणलेले पाच मादी आणि तीन नरचित्ते भारतामध्ये सोडण्यात आले, त्या सर्वांची प्रकृती ठीक आहे आणि ते आनंदी आहेत, असा संदेश देऊन पंतप्रधानांनी भारत नामिबिया यांच्यातील सांस्कृतिक संबंधांचे हे चित्ते प्रतीक बनले आहेत, असा संदेश दिला. प्रोजेक्ट चित्ता हा जगातील पहिला आंतरखंडीय पर्यावरण संवर्धनाचा अभिनव प्रयोग आहे. २१ व्या शतकात भारत जगाचे विकास नेतृत्व करत आहे. आपण आपली अस्मिता आणि ओळख न विसरता विकासाचे लक्ष गाठू शकतो. आपण आपल्या रस्त्यावर चालतो. आपल्या संस्कृतीच्या खानाखुणा जपतो आणि जगाला दिशा देतो. शक्तीने नव्हे, तर भागीदारीने, वर्चस्वाने नव्हे तर सुसंवादाने भारत जगात नवा प्रकाश देऊ इच्छितो. स्वातंत्र्यापासून समृद्धीपर्यंत आणि स्वयंपूर्णते पर्यंत आम्हाला वाटचाल करावयाची आहे. केवळ आम्हा दोन्ही देशांसाठीच नव्हे, तर सबंध मानव जातीसाठी आम्हाला कल्याणकारी कार्य करावयाचे आहे. प्रगती आणि समृद्धीचे भागीदार होऊयात. आमच्या नव्या पिढीला भविष्य बांधावयाचे आहे. भारत आणि नामिबियाचा भविष्यकाळ त्यामुळे उज्वल आहे. वसाहतीच्या काळापासून स्वातंत्र्यलढियापर्यंत भारत आणि नामिबिया दोघेही संविधानाच्या आधारे वाटचाल करत आहेत. स्वातंत्र्य आणि न्याय हा आमच्या जीवनाचा समान धागा आहे. दक्षिणेकडील जगातील देश समान स्वप्ने आणि समान संधी शोधत आहेत. आपण मला तुमच्या देशाचा सर्वोच्च सन्मान देऊन गौरव केलात. मी असे मानतो की, हा उभय देशांतील लोकांचा सन्मान आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरीही शांतता व समृद्धीवर अढळ विश्वास ठेवून आपण वाटचाल करत आहोत. आम्ही नामिबियाशी असलेल्या ऐतिहासिक संबंधांचा सन्मान करतो आणि भविष्यातील आमची भागीदारी ही सुद्धा नव्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी पूरक ठरेल. नामिबियाच्या व्हिजन २०३० मधील स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी भारत सक्रिय सहकार्य देईल. भारतातील शिष्यवृत्ती आणि क्षमता संवर्धन कार्यक्रमांचा सतराशे नामिबियातील तरुणांना लाभ झाला





प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर
मो. 9225313592 ई-1108,
कल्पतरू, ग्लोरिया ग्रेस, बावधन, पुणे


आहे, हे विशेष होय. शास्त्रज्ञ, डॉक्टर आणि संशोधक या सर्वांचा नामिबियातील माहिती तंत्रज्ञान संशोधन केंद्रास भारताने सतत सहकार्य केले आहे. नामिबिया विद्यापीठ परिसरात भारतीय संशोधन सहकार्याचे प्रतिबिंब दिसून येत आहे. भारत आणि नामिबिया यांच्यातील व्यापार ८०० दशलक्ष डॉलर्स आहे व तो सतत वाढत राहील.

उत्साही व आनंदी डायसोरा नामिबियातील अनिवासी भारतीय पंतप्रधानांच्या भेटीने उत्साहित झाले आहेत आणि त्यांना ही एक सुवर्णसंधी वाटते. सध्या नामिबियामध्ये ५०० भारतीय नागरिक निवास करत आहेत. तेथील उद्योग समूहामध्ये पाच हिरे उद्योग भारतीय उद्योगपती चालवीत आहेत आणि या हिरे उद्योगांमध्ये तंत्रज्ञ, कामगार, अधिकारी असे मिळून ५०० भारतीय कार्यरत आहेत. त्यांनी नामिबियाच्या विकासात मोठी भूमिका पार पाडली आहे. शिवाय नामिबियातील असंख्य नागरिक या उद्योग समूहातून रोजगार मिळवत आहेत म्हणजे भारतीय उद्योगांनी नामिबियातील सुमारे दहा ते पंधरा हजार लोकांना रोजगार दिला आहे. उभय देशांतील व्यापार काही वर्षात दुप्पट करण्याचा दोन्ही देशांचा संकल्प आहे. पंतप्रधानांच्या भेटीमुळे तेथील नागरिक आणि भारतीय नागरिक यांच्यातील आदान-प्रदान म्हणजेच लोकसंपर्काला नवे सामर्थ्य लाभत आहे. पर्यावरण संवर्धन असो, सांस्कृतिक आदान-प्रदान असो की पर्यटन पातळीवरील उत्साही देवाण-घेवाण असो, दोन्ही देशांमध्ये संपर्काचे विश्व संपन्न, समृद्ध आणि तेवढेच प्रभावशाली बनत आहे. जेव्हा सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकास हा नव्या दिशेने विकसित होतो, पण तेव्हा अशा विकासासाठी हवे असते ते परस्परपूरक आणि हितवर्धक वातावरण. असे वातावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नामिबिया भेटीमुळे तयार झाले आहे, ही गोष्ट सगळ्यात महत्त्वाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे भारतीय डायसपोरा नामिबियाच्या संस्कृती आणि परंपरांशी भक्कमपणे जोडला जात आहे आणि त्यांच्या विकासात एक महत्त्वाचा भागीदार म्हणून उदयास येत आहे. पारंपरिक लोककला आणि नृत्य सादर करून स्थानिक लोकांनी पंतप्रधानांच्या आगमनानिमित्ताने व्यक्त केलेला आनंद हा उभय राष्ट्रांमधील विश्वास वाढविणारा ठरला आहे.

(क्रमशः)




## जात्यावरच्या ओव्या......

बाप माझा वाघ
मि त वाघाची वाघीण
बोलला गव्हार
झाली जीवाची आगीन ||१६८||

उन्हाळ्याचं उन
उन लागत लाही लाही
दादा गेले गावी
छतरी नेली नाही||१६९||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## माणूस भेटतो तेव्हा...




ज्योतिर्मय साहित्य

परवाच्या दिवशी मला स्वप्नात एक माणूस भेटला. काय ? विश्वास नाही बसत ? अहो, खरंच सांगतोय ! मी त्याला म्हटलं सुद्धा की तू कोण आहेस ? म्हणाला, '' नाही ओळखलंस ना मला ? अरे, मी माणूस आहे माणूस ! '' मी जरा हसलोच. म्हटलं जरा वेडाच दिसतो. मग त्याला म्हटलं, '' अच्छा, तू माणूस आहेस होय ? मला वाटलं की अजून कोणी वेगळा प्राणी ! ''तो जरा हसला आणि म्हणाला, ''माणूसच आहे मी. चक्क माणूस. नीट बघ माझ्याकडे.''




मी हसलो. म्हणालो, ''त्यात काय बघायचं ? अरे, भल्या माणसा, चार माणसांसारखाच माणूस तू ! वेगळं काय आहे तुझ्यात ? दोन हात, दोन पाय, डोकं, डोळे.. सगळं सगळं तर माणसासारखंच तर आहे. आणि मी पण तुझ्यासारखा माणूसच आहे ना ! '' तो पुन्हा हसला. म्हणाला, ''तू आणि माणूस ? तोंड बघा नुसतं !''

आता माझी तर पूर्ण खात्रीच झाली की याचं जरा फिरलेलंच दिसतं. पण आता काही इलाज नाही. गाठ पडलीच आहे तर बोलावंच लागणार. मी म्हटलं, अरे असं काय बोलतोस ? काय कमी आहे माझ्यात ? मी पण तुझ्यासारखा माणूसच आहे. हां, आता तुझ्या चेहऱ्यावरील तेज जरा जास्त आहे एवढंच. तो पुन्हा हसून म्हणाला, अरे, नुसते दोन हात पाय, डोकं वगैरे असलं तरी माणूस होत नाही. तो प्राणी फक्त दिसतो माणसासारखा. पण तुला सांगू का ? तसा दिसणारा हा माणूस धड माणूसही नाही आणि धड प्राणीही !

मला कळेना की याला नेमकं काय म्हणायचं आहे ! त्याला म्हटलं, ''हे बघ गड्या, असं भलतंसलत काही बोलू नकोस. तुझ्यात आणि माझ्यात काही फरक नाही. अरे दोस्ता, माणूस म्हणजे बुद्धिमान, प्रगत प्राणी. बघ आम्ही केवढी प्रगती केली ! खूप नवनवीन शोध लावले. चंद्रावर, मंगळावर जाऊन पोहोचलो. आता आमची बहुतेक सगळी कामे यंत्राने होतात. यंत्रमानव आमच्या दिमतीला आहे. माणूस असून असून असा वेगळा काय असणार आहे ?''

त्याच्या चेहऱ्यावर मिश्किल हास्य होते. मला म्हणाला, '' हे सगळं असलं म्हणजे काही माणूस होत नाही.''

आता मात्र माझा संयम सुटू लागला होता. मी त्याला म्हटलं, ''हे पहा, मानव घर बांधून त्यात राहतो. हे माझं घर बघ. किती सुंदर आहे ! सगळ्या अत्याधुनिक सुखसोयी त्यात आहेत ! घरातील सुंदर फर्निचर आताच बनवून घेतलं. छानपैकी भारीतला रंग दिलाय. माझ्याकडे एक फोर व्हीलर, दोन टू व्हीलर आहेत. घरात बायको आहे, मुलं आहेत. छानपैकी पुस्तकं आहेत. आम्ही विद्यापीठातून चांगली पदवी प्राप्त केली आहे. माणूस म्हणवून घेण्यासाठी अजून काय हवं ?'' **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## गुरूनिश्चय

ज्योतिर्मय साहित्य


जन्म झाल्यापासून माणूस शिकत असतो. ज्ञान संपादना साठी त्याला गुरूची गरज असते. त्याशिवाय ज्ञान मिळत नाही. हे झसे खरे. तसे ईश्वर दर्शन किंवा आत्मज्ञान करून घेण्यासाठी गुरू करणे गरजेचे असते. ज्ञान, कला, विद्या देणारे ''गुरू'' तर भगवंताचे ज्ञान करून देणारे ''सद्गुरु'' समजावे. संतांच्या मते ग्रंथ वाचून किंवा एखादी कला हस्तगत करून त्याला जाणत्या माणसाचा सहवास लागला तर ते ज्ञान होते. पण परमार्थ हा सर्वस्वी सूक्ष्म अतिंद्रिय विषय आहे. सामान्य माणसाला तो अज्ञात असतो. म्हणून तो समजून घेण्यासाठी तरी सद्गुरुची गरज असते.

शल्यलेखा

स्त्रीमुक्ति स्वातंत्र की स्वैराचार ?

दिवसेंदिवस हा विषय गंभीर होय चालला आहे. आजकाल चौकोनी कुटूंबात आपल्या मुलाबाळांना काहीच कमी पडू नये या साठी पालकांचा आटापिटा चाललेला बघतो. आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी बाबांच्या खांद्याला खांदा लाऊन आई पण घराबाहेर पडते चिमुकले आधी शाळेत व शाळा सुटल्यावर एक तर घरी रहातात किंवा त्यांची रवानगी पाळणाघरात होते. चौकोनात बाकीच्या गणगोताला स्थान नसते. ऊदा, आजीआजोबा, काका, काकु, मामामावशी, आत्या (त्यासाठी नाते कळावीत म्हणून इव्हेंट घेतले जातात) या एकदिवसीय नाते कार्यशाळेत सगळं कसं अगदी गुडीगुडी असतं मग आपले रक्ताचे नातेवाईक किंवा संस्कृती जोपासणारे मित्र परिवारात ३६४ दिवस काय चालते ह्यात नाक खुपसण्यास कुणालाही परवानगी नसते. नसत्या चौकशा का करायच्या किंबहुना अपमान झालाच तर नकोच त्या फंदात पडायला ! म्हणून एकतर अंग काढू घेतले जाते नाही तर कायमचे दुरावले जाते. **(क्रमशः)**

## संत कसे असतात?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आपले शहाणपण बाजूला ठेवून जो संताला शरण जातो तोच खरा साधक. ज्याला सर्व सृष्टी रामरूप दिसते, आणि शिष्यालाही जो रामरूप पाहतो, तोच खरा गुरू. सद्गुरू कधीही मिंधेपणाने वागत नाही, आणि त्याला भीतीचा लवलेशही नसतो. आपला शिष्य कोणत्या आध्यात्मिक भूमिकेवर आहे हे संतांना कळते. देहबुद्धीचे लोक विषयाचे दास असतात, पण संत मात्र विषयावर मालकी गाजवतात. संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, किंवा त्याची आवड उत्पन्न झाली म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे. औषध काय आहे हे न कळतासुद्धा रोग्याने ते श्रद्धेने घेतले तर त्याला गुण येतो, किंवा एखाद्याला स्वयंपाक करता आला नाही तरी त्याला अन्नाची चव समजते आणि तो पोटभर जेवू शकतो. त्याचप्रमाणे एखाद्याला ज्ञानाचा अनुभव येईल, पण शब्दाने त्याला तो सांगता येईलच असे नाही.

मीठ खारट आहे याचे जसे आपल्याला दु:ख होत नाही, त्याचप्रमाणे जगामधल्या लढाया, हाणामाऱ्या, सज्जनांचा छळ, संकटे, यांचे संतांना वाईट वाटत नाही. 'वाईट वाटत नाही' याचा अर्थ ते त्यांना आवडते असा मात्र मुळीच नव्हे. पण मीठ जसे खारटच असणार, तशा जगात या घडामोडी होणारच, जगाची रहाटीच अशी आहे, हे समजून तो दु:ख करणार नाही. किंबहुना, मीठ फार झाले तर खारटपणा जसा सहन होत नाही, तसे त्यालाही होईल. इतकेच नव्हे, तर त्याचा प्रयत्नही जगातले वाईट कमी करण्याकडेच असतो.

विहिरीतल्या बेडकांना जशी समुद्राची कल्पना येत नाही तशी आपल्याला संतांची कल्पना येत नाही. संत हे पहिल्याने आपल्यासारखेच होते, परंतु अनुसंधानाच्या मार्गाने ते वर गेले. आपल्याला संत 'शोधण्याची' मुळीच जरुरी नाही. आपली इच्छा बलवत्तर असेल तर संतच आपला शोध करीत आपल्याकडे चालत येतील. आपली भावना कशी आहे इकडे संतांचे लक्ष असते. संत हा गुप्तपोलिसासारखा आहे; तो आपल्यामध्ये आपल्यासारखा राहतो, पण आपल्याला ओळखता येत नाही. संताला स्वत:च्या शरीरात काय चालले आहे ते सर्व दिसते; म्हणून तो रोगाची काळजी करीत नाही. संताला कर्म मागेपुढे करता येते, पण ते टाळता येत नाही; ते कुणाला तरी भोगलेच पाहिजे. संत जे साधन सांगतात ते आपल्या शक्तीप्रमाणेच असते. संत जो बोध सांगतात, त्याचे आपण थोडेतरी पालन करू या.

संत हा जसे बोलतो तसे वागतो. आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट.

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

म्हणून जेव्हा आपण आपले आज्ञाचक्र पायाच्या अंगठ्याच्या पेरावर टेकवितो तेव्हा एकाच वेळी तेथून व नेत्राद्वारे येणारे दिव्य किरणे मस्तकाच्या मागील बाजूने शोषून घेण्याची प्रक्रिया सुरू होते म्हणूनच आपण चरणावर डोके टेकून नमस्कार घालत असतो.

पांडुरंगाच्या चरणा पासून प्रस्फुटीत होणारे तेज इतके अगणीत लावण्याचे की त्याची शोभा वर्णन करणे अशक्य आहे. असे माऊली म्हणतात.विठ्ठल हा मूळचा कर्नाटकचा. पांडुरंगाने मला अशा दिव्य रूपात दर्शन दिले असे माऊली सांगतात.

शब्दविण संवादू दुजे विन अनुवादु/ हे तव कैसेनि गमे/
परेही परते बोलणे खुंटले/ वैखरी कैसे नि सांगे/

ज्यावेळेस मन हे विषयाकडून निघून आत्म्याकडे वळलेले असते, त्यावेळेस ते मृतप्राय झालेले असते. मी तू पण हा भेद संपलेला असतो. शब्द मावळलेले असतात. आता त्याच स्थितीत येणारा अनुभव शब्दा शिवाय कसा मांडणार ?कारण तो अनुभव शब्दात मांडण्याला मन हे जिवंत नाहीच. जवळपास ती समाधी अवस्था आहे. शब्दच नाहीत. अशा स्थितीत कोणतेही मंत्र स्मरत नाहीत. म्हणता येत नाहीत. म्हणून हा अनुभव शब्दातून मांडणे किती कठीण आहे, हे आपण जाणून घ्या.

ज्यावेळेस साधकास आत्मज्ञान होते.आत्म्याची दिव्य प्रभा त्याच्या बुद्धीवर पडते, त्यावेळेस त्याला आत्मा हाच परमात्मा आहे हा अनुभव येतो. साधक स्वतःच परमात्मा आहे. त्यामुळे हा अनुभव त्यास दुसरा कोणी उरलाच नाही. मी आणि तू हे दोन वेगळे उरलेच नाहीत.

या अद्वैताचा अनुभव माऊली सांगत आहेत.

भगवंताच्या नामाचे मुखाने उच्चारण आपण करतो त्यावेळेस ती वैखरी वाणी असते. मनातल्या मनात किंचित पुटपुटणे व बहुतांश नाम मनातच स्मरल्या जाणे याला मध्यमा म्हणतात. मध्यमेतून केलेला एक माळ जप हा वैखरीतून केलेल्या लाखो जपा इतका सक्षम असतो. ज्यावेळेस आपल्या मनात प्रभुचे रूप आणि नाम सतत अखंडपणेअंतर्मनात फिरत राहते त्यावेळेस ते नाम सूक्ष्म, अती सूक्ष्म स्तरावर गेलेले असते. यात रूप अंतर्मनां समोर असणे याला पश्चंती असे म्हणतात. पश्चंती म्हणजेच पाहणे. मनाच्या नेत्राद्वारे पाहणे. असा पश्चंतीतील एक माळ जप हा मध्यमेचा शेकडोमाळे पेक्षा जास्त प्रभावी असतो. याच्याही आत जेव्हा आपल्या अंतर्मनात भगवन्नामाचा उच्चार आपोआप व्हायला लागतो व ते नाम साधक केवळ ऐकत राहतो याला परावाणी असे म्हणतात.(संत जनाबाई कडे एकदा कबीर दास जी त्यांना झालेल्या दृष्टांता प्रमाणे भेटावयास आले होते. त्यावेळेस घरातील धुणी ,भांडी करणारी, साधारण दिसणारी, जनाबाई ही शेणाच्या गोवरी वरून नामदेवांच्या आईशी भांडत होती. जेव्हा कबीरांनी भांडणाचे कारण जाणले तेव्हा त्यांना वाटले साध्या गोवरी साठी भांडणारी ही कसली सिद्ध संत असणार?त्यांच्या मनीचा हा भाव जनाबाईंनी ओळखला व ती म्हणाली, अरे वा.. वा किती मेहनत करून आम्ही शेण गोळा करून या गोवर्या थांपतो. मग आम्ही अशा बऱ्याच दुसर्याला घेऊ देऊ. तुम्हीच निवड करून सांगा, ही गोवरी कोणाची?

कबीरजी म्हणाले मी कसे ओळखणार? त्यावेळेस जनाबाई म्हणते शेणाची गोवरी कानाला लावून पहा, ज्या गोवरीतून विठ्ठल विठ्ठल हा नाद ऐकू येईल ती गोवरी माझी. याप्रमाणे कबीरदासजींना काही गोवऱ्यातून विठ्ठल विठ्ठल हा नाद स्पष्टपणे ऐकू आला. ही परावाणी आहे. साधारण वाटणाऱ्या जनाबाईंनी एका क्षणात कबीरदासजींना परावाणी ऐकण्याची पात्रता दिली) इथे साधक नाम उच्चारण करीत नाही तर तो ते केवळ ऐकण्याची क्षमता बाळगतो.

**(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं मे दृष्टिविषयो भव।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे वाणीविषयो भव।। ४८ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या दृष्टीचा विषय हो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या वाणीचा विषय हो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रीगुरुणाभिपूजिते।**
**सुराराध्ये कुलाराध्ये समर्चिते नमो नमः।। ४९ ।।**

हे श्रीगुरुंनी अभिपूजित जगदंबिके, तुला नमस्कार असो. देवांची आराध्य, कुलाची आराध्य,समर्चिते अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रव्या कथा मया तव।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कथ्या कथा मया तव।। ५० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी ऐकावी. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी सांगावी.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कुलरक्षणहेतवे।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं नित्यमुत्कर्षहेतवे।। ५१ ।।**

कुलाच्या रक्षणासाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो. नित्यउत्कर्षासाठी श्रीरेणुके, तुला नमस्कार असो.

## आरोग्य संजीवनी



### फंगल इन्फेक्शन

ज्योतिर्मय साहित्य

फंगल इन्फेक्शन (बुरशीजन्य संसर्ग) ही एक सामान्य समस्या आहे जी बुरशीमुळे होते. ही बुरशी आपल्या आजूबाजूच्या वातावरणात असते आणि शरीराच्या विविध भागांना जसे की त्वचा, नखे आणि केसांना संक्रमित करू शकते.

फंगल इन्फेक्शन कशामुळे होते?

फंगल इन्फेक्शन होण्याची अनेक कारणे आहेत

उष्ण आणि दमट वातावरण : बुरशीला वाढण्यासाठी उबदार आणि ओलसर वातावरण आवडते. त्यामुळे अशा वातावरणात फंगल इन्फेक्शन होण्याची शक्यता जास्त असते, विशेषतः पावसाळ्यात.

ओले कपडे घालणे : ओले कपडे जास्त वेळ घातल्याने त्वचेवर बुरशी वाढू शकते.

घाम : ज्यांना जास्त घाम येतो त्यांना फंगल इन्फेक्शन होण्याची शक्यता जास्त असते.

कमजोर रोगप्रतिकारशक्ती : ज्या लोकांची रोगप्रतिकारशक्ती कमजोर असते, त्यांना फंगल इन्फेक्शनचा धोका अधिक असतो.

वैयक्तिक स्वच्छतेची काळजी न घेणे : योग्य स्वच्छतेचा अभाव हे देखील एक महत्त्वाचे कारण आहे.

घट्ट शूज किंवा कपडे घालणे : यामुळे त्वचेला हवा लागत नाही आणि घाम जमा होऊन बुरशी वाढते.

मधुमेह (डायबिटीज) : मधुमेहाच्या रुग्णांना फंगल इन्फेक्शनचा धोका जास्त असतो.

संक्रमित व्यक्तीच्या वस्तू वापरणे : संक्रमित व्यक्तीचे कपडे, टॉवेल किंवा इतर वस्तू वापरल्याने हा आजार इतरांना पसरू शकतो.

स्टिरॉइड क्रीमचा वापर : काहीवेळा डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्टिरॉइड क्रीम वापरल्याने इन्फेक्शन वाढू शकते.

फंगल इन्फेक्शनची लक्षणे

फंगल इन्फेक्शनची काही सामान्य लक्षणे खालीलप्रमाणे आहेत:

त्वचेला खाज सुटणे.

त्वचेवर लाल रंगाचे गोल चट्टे येणे (उदा. दाद किंवा रिंगवर्म).

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

त्वचेतून पांढऱ्या रंगाचा पदार्थ निघणे (उदा. यीस्ट इन्फेक्शनमध्ये).

त्वचेला भेगा पडणे किंवा फटी पडणे.

जळजळ होणे.

सतत केस गळणे (टाळूवरील फंगल इन्फेक्शनमध्ये).

नखांचा रंग बदलणे किंवा नखे जाड होणे (नखांच्या बुरशीमध्ये)

फंगल इन्फेक्शनचे प्रकार:

ॲथलीट्स फूट : हा पायांवर होणारा सामान्य बुरशीजन्य संसर्ग आहे, ज्यात खाज सुटणे, जळजळ होणे आणि त्वचेला भेगा पडणे ही लक्षणे दिसतात.

दाद : हा अत्यंत संसर्गजन्य बुरशीजन्य संसर्ग आहे जो त्वचा, टाळू आणि नखांना प्रभावित करतो. यात लाल, गोलाकार पुरळ आणि खवलेयुक्त त्वचा दिसते.

जॉक इच : हा जांघेच्या भागात होणारा संसर्ग आहे, ज्यात खाज सुटते आणि लालसरपणा येतो.

कँडिडा इन्फेक्शन : हे यीस्ट (कँडिडा) मुळे होते आणि तोंडाच्या आत (थ्रश), योनीमार्गात किंवा त्वचेच्या पटलांमध्ये होऊ शकते.

फंगल इन्फेक्शनवर उपचार आणि घरगुती उपाय

फंगल इन्फेक्शनवर उपचार करण्यासाठी डॉक्टर अँटीफंगल क्रीम, पावडर किंवा गोळ्या देतात. पण काही घरगुती उपाय देखील फायदेशीर ठरू शकतात.

**(क्रमशः)**

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

माणसाला बुडविणारा काम असतो. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. कामाचे सेवन हे जीवनाच्या निर्वाहसाठी असावे, आम्ही टिकलो पाहिजे म्हणून काम हवा. इंद्रियांची तृप्ती साठी नाही. विराट म्हणाला रंभे साठी माझे मनात मोह झाला. मी भगवंतास विसरलो. आपणही हातात मोबाईल आला की आपण ऑफिस, देवपूजा विसरतोच ना? हा विराधच नाही काय? मला

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

असा उशाप मिळाला की रामाचे हस्ते तुला .मुक्ती मिळेल. जो शस्त्राने मरत नाही त्याला पुरून मारावे असे शास्त्र सांगते. विराध राक्षस शस्त्राने मरणार नव्हता. म्हणून लक्ष्मणाने खड्डा खोदला त्यात विराधाला पुरले.

तिथून राम शर भंग ऋषीच्या आश्रमात आले तिथे तेज होते. अनेक देवता होत्या. तिथे इंद्र होता. ते हे तिघे येण्याआधी निघून गेले. शर भंग ऋषी म्हणाले मला जीवनात जे मिळवायचे ते मिळाले आहे. आपल्या दर्शनाने कृत कृत्य झालो.तिथे तिघे तिथे राहिले दुसरे दिवशी शर भंग ऋषीने अग्नी प्रज्वलित केला आणि त्यात त्यांनी प्रवेश करून जीवन संपविले. त्या पूर्वी पुढे कुठे जायचे हे त्यांनी सांगितले.

रस्त्यावरुन जाताना सीता रामास प्रश्न विचारते. आपण दिव्य पुरुष आहात महान आहात, परब्रम्ह आहात. जर धर्माचा सूक्ष्म विचार केला तर तुम्ही अधर्म करीत आहात. हे कोण बोलतंय? एक पत्नी, आपल्या पतीला बोलते आहे.

**(क्रमशः)**


## फुलमाला....




अनंत...

झुळकितून गंध आला
मोहरला आसमंत
शुभ्र टपोरे रूप लेवूनी
फुलला हा अनंत

सौ.माधुरी म .इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### शांतिनिकेतन ते विश्वभारती

त्यांनी आपल्या मनाशी या विद्यापीठाचे जे नाव निश्चित केले ते अत्यंत समर्पक असे होते ते म्हणजे विश्वभारती ! यत्र विश्वं भवत्येकनिडम या वैदिक ऋचेतून त्यांना हे नाव ठेवण्याची प्रेरणा मिळाली असे दिसते. त्याचा अर्थ असा की ही संस्था अशी असावी की जिथे संपूर्ण विश्व एखाद्या घरट्याप्रमाणे आपण एकत्र करू शकू. या संस्थेचा असा विकास झाला पाहिजे की जगातील विविध भागातील लोक आध्यात्मिक संपत्तीची देवाणघेवाण करण्यासाठी इथे आकृष्ट झाले पाहिजेत. जगभर प्रवास करताना रवींद्रनाथांनी हे पाहिले होते की जगातील विविध विद्यापीठे शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांना केवळ बौद्धिक ज्ञान किंवा खाद्य पूरवत होते. परंतु व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर केवळ बौद्धिक विकास होऊन चालणार नाही तर भावनिक विकासही होईल अशा प्रकारचे शिक्षण विद्यापीठातून दिले गेले पाहिजे असे त्यांना वाटत होते. विद्यापीठांनी विज्ञान, शास्त्र इत्यादी विषय शिकवत असतानाच ललित कला आणि त्या समूहात येणाऱ्या इतर विषयांना देखील तसेच मानाचे स्थान मिळवून द्यावे त्यायोगेच विद्यार्थ्यांचा खरा विकास होईल. शिक्षणाचा हेतू केवळ ज्ञानासाठी ज्ञान असा मर्यादित न राहता मानवाला समजून घेऊन इतरांना त्याचा मानव म्हणून परिचय होण्यासाठी असावा. बहिणाबाईंच्या शब्दात सांगायचे तर माणसा माणसा कधी होशील माणूस असं माणूस बनवणारं, माणूस घडवणारं शिक्षण विद्यापीठांनी देणं त्यांना अपेक्षित होतं. आपल्या विश्वभारती या विद्यापीठात अशा प्रकारचं शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावं म्हणून त्यांनी जगभरातील नामवंत विद्वानांना भारतात आमंत्रित केलं. २२ डिसेंबर १९२१ रोजी या विद्यापीठाचे उद्घाटन झाले प्रसिद्ध तत्त्वज्ञ डॉ. ब्रजेंद्रनाथ सील, प्रो. सिल्वान लेव्ही हे याप्रसंगी उपस्थित होते. प्रो. सिल्वान लेव्ही यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यापीठात चिनी भाषा आणि साहित्याचा अभ्यास करण्याची योजना आखली गेली. विद्यापीठाच्या किरकोळ खर्चाची हातमिळवणी करण्यासाठी संस्थेची काही जमीन विश्वभारतीला रवींद्रनाथांनी देणगी म्हणून दिली. आपल्या शिक्षणविषयक कार्याच्या आयुष्यभर केलेल्या धडपडीतून रवींद्रनाथांची प्रतिमा एक थोर शिक्षणतज्ज्ञ म्हणून जगासमोर आली होती. शांतिनिकेतन ते विश्वभारती हा रवींद्रनाथांचा जो प्रवास झाला त्याचा आढावा या छोट्याशा लेखात घेण्याचा प्रयत्न केला असला तरी रवींद्रनाथांनी आपले संपूर्ण आयुष्य याच्यासाठी खर्ची घातले आहे. श्री निकेतनची स्थापना – या लेखमालेच्या मागील भागांमध्ये आपण रवींद्रनाथांनी शांतिनिकेतन आणि विश्वभारतीची स्थापना कशी आणि का केली ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. भारतीय संस्कृती आणि परंपरांची जगाला ओळख व्हावी, भारतीय संस्कृती जाणून घेण्यासाठी उत्सुक असलेल्या लोकांचा ओढा भारताकडे लागावा आणि विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा बौद्धिक भावनिक आणि सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने रवींद्रनाथांनी विश्वभारतीची स्थापना केली. पण एवढ्याने रवींद्रनाथांचे समाधान झाले नाही. केवळ विद्यार्थ्यांचे हित न पाहता ज्या समाजात आपण राहतो त्या स्थानिक समाजाचाही विकास व्हावा, त्यांची भौतिक प्रगती व्हावी, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची आणि वैज्ञानिक प्रगतीची योग्य ती माहिती मिळावी आणि शेती आणि उद्योगधंद्याच्या कामात योग्य ते मार्गदर्शन मिळावे असे त्यांना वाटत होते. या उद्देशानेच शांतिनिकेतन पासून जवळ असलेल्या सुरुल या ठिकाणी त्यांनी ग्रामीण क्षेत्रात कल्याणकारी कामे करणारा विद्यापीठाचाच एक विस्तारित विभाग सुरू करण्याचे ठरवले. त्याला त्यांनी श्रीनिकेतन असे सुंदर नाव दिले. श्री म्हणजे विकास किंवा कल्याण. श्रीनिकेतन म्हणजेच लक्ष्मीचे वस्तीस्थान ! आतापर्यंत अठरा विश्वे दारिद्र्य असणाऱ्या ग्रामीण भागात या माध्यमातून लक्ष्मीच्या पावलांचा प्रवेश होईल अशी त्यांची कल्पना होती. **(क्रमशः)**

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906


# कहाणी सोमवारची.. खुलभर दुधाची...

ज्योतिर्मय साहित्य

एका आटपाट नगरीचा राजा शिवभक्त होता. एकदा त्याच्या मनात आले आपल्या महादेवाचा गाभारा दुधाने भरावा. पण हे घडणार कसे? मग त्याला प्रधानाने युक्ती सांगितली. राजाने दवंडी पिटली गावातल्या सर्व माणसांनी घरचं सगळं दूध घेऊन जर सोमवारी महादेवाच्या देवळी पूजेला यावं. सर्वांनाच राजाचा धाक. त्यामुळे नगरातील सगळ्यांनी घाबरून घरात काही दूध ठेवले नाही. मुलांना, वासरांना पाजले नाही सगळे दूध गाभाऱ्यात पडले तरी गाभारा भरला नाही.

पण त्याच राज्यातील एका म्हाताऱ्या बाईने मुलाबाळांना खाऊ घातलं, लेकी सुनांना न्हाऊ घातलं, गाय वासरांना चारा दिला आणि सगळ्यांचा आत्मा थंड झाल्यावर आपल्या जीवाचे सार्थक व्हावे म्हणून ती चार तांदळाचे दाणे, बेलाची पाने आणि खुलभर दूध घेऊन देवळात आली. आणि मनोभावे दूध अर्पण केले आणि देवाला नमस्कार, प्रार्थना करून निघून गेली. इकडे चमत्कार झाला आणि गाभारा पूर्ण दुधाने भरून गेला.

हा चमत्कार गुरुवाने (देवाचा पुजारी) राजाला सांगितला. पण कशाने आणि कोणामुळे भरला हे राजाने तिसऱ्या सोमवारी शोधून काढले. म्हातारीचा राजाने हात धरून कारण विचारल्यावर तिने अभय मागितले आणि





**॥ अध्यात्म ॥**



सौ.माधुरी म.इनामदार
मिरज. मो. 78755 99497

राजाला काय सांगितले तर राजा तुझ्या आज्ञेमुळे वासरांचे मुलांचे आत्मे तळतळले, मोठ्या माणसांचे हाय माथी आले त्यामुळे गाभारा भरला नाही.

राजाला हे पटले त्यामुळे चौथ्या सोमवारी त्याने स्वतः पूजा करून मुला बाळांना गाई वासरांना दूध ठेवून उरलेले दूध गाभाऱ्यात महादेवास भक्ती भावाने वाहिले आणि त्यावेळी गाभारा दुधाने पूर्ण भरला.

ही कहाणी मला खूप आवडते. याचे सगळ्यात पहिले कारण म्हणजे कोणाच्याही तोंडचा घासच काय कोणतीच गोष्ट हिसकावून घेऊ नये. माणसांच्या, प्राणी, पक्ष्यांच्या मनातील खरा देव ओळखून त्याला तृप्त करावे. त्यांचा आत्मा तृप्त केला तरच देव प्रसन्न होतो.

तसेच दुसरी गोष्ट. म्हणजे बहुतेक सर्व चातुर्मास कहाण्यात राजाने अभय दिले तर तो आपला दिलेला शब्द पाळतो. हा विश्वास मला खूप मोलाचा वाटतो.

म्हातारी साधी, गरीब आहे म्हणून राजाने तिच्या बोलण्याकडे अजिबात दुर्लक्ष केले नाही. उलट तिचे शब्द प्रमाण मानून कृती केली. यामध्ये सर्वांभूती देव आहे हे सहज पटवून दिले आहे म्हणून ही कहाणी मला खूप आवडते..

ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण (साठ भागाची कहाणी पाच भागात संपवली. कंटाळा टाळण्यासाठी कहाणी थोडक्यात संपविली. मला माझ्या भावाने सांगितलेला अर्थ..)

# मन चिंब पावसाळी काव्य मैफलीस रसिकांची दाद

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** ध्यास गझल साहित्य समूह, टेरेस वरील कविता समूह, शताब्दी काव्य मंडळ आणि ट्रान्स डेल्टा फाउंडेशन आयोजित मन चिंब पावसाळी.. पाऊस, प्रेम आणि इतर कवितांची बहारदार मैफल मृदगंध कला दालन येथे चांगलीच रंगली. पावसाच्या सरींसोबत मनातील भाव भावनांचा वेध घेणाऱ्या दर्जेदार कवितांची जुगलबंदी रसिकांनी अनुभवली. सोबतच प्रा.प्रवीण बोबडे ह्यांच्या मधुर स्वरात पावसाची गाणी देखील ऐकायला मिळाली. पाऊस, प्रेम ह्यांवरील कविता आणि पावसाच्या गाण्यांनी मैफल चांगलीच रंगली. कस्तुरी कुलकर्णी ह्यांनी

अजूनही ओले पान मनाचे
जरी पुराना झाला पाउस,
आठवणींच्या गावी भेटतो
पुन्हा नव्याने बीज पेरतो.

ही कविता सादर केली तर रमेश ठोंबरे ह्यांनी

कसे साधले ना पुन्हा पावसाने,
तुला गाठले ना पुन्हा पावसाने,
तुझ्या गोड हास्यातूनी जाणले मी
तुला छेडले ना पुन्हा पावसाने.

ही गझल सादर केली.

गिरीश जोशी ह्यांनी,

समजला कुठे का कुणा पावसाळा
ऋतुंच्या घरी पाहुणा पावसाळा

ही गझल सादर केली.

ऋषभ कुलकर्णी ह्यांनी,

झळा सोसून गेलेल्या तुझ्या माझ्या वसंताला,
सुखाची सर बरसणारे नवे श्रावण हवे आहे.

हे गझलेचे शेर सादर केले. दीपक हापत ह्यांनी

असे काय होते तुला पाहतांना
जगाला विसरतो तुला पाहतांना





ही गझल सादर केली. तर रूपाली पाटील ह्यांच्या

आपणच ठरवायचं की, कधी द्यायचा पूर्णविराम

ह्या कवितेने मैफलीत रंग भरले. प्रशांत नानकर ह्यांच्या

दोन्ही बरसले तेव्हा, फरक उमगला नाही,
डोळ्यातून आले थोडे, नभातून आले काही.

ह्या ओळी दाद घेऊन गेल्या. सुनिता कपाळे ह्यांनी

रिमझिम बरसत्या सरीत, बेभान गंधाळते अवनी.

ही कविता सादर केली. शमा बरडे ह्यांनी,

कशी लिहू पाना फुलांच्या

ही कविता सादर केली. प्रा विजय पोहनेरकर ह्यांनी,

समजंवावं कुठवरी काही उमगत नाही,
काय झालं कुणा ठावं पाऊस येत नाही.

ही कविता सादर केली.

शैलेश देशपांडे ह्यांच्या ‘‘ती चंद्रभागेसारखी स्पर्शून जाते, मी वाळवंटासारखा तल्लीन होतो.‘‘

या कवितेने मैफल रंगवली. ज्ञानेश्वर कुलकर्णी ह्यांनी अभंग सादर केला. डॉ सुशील सातपुते ह्यांनी

बरं झालं बाप्पा तू पक्षात नाहीस,
पक्षांचं चिन्ह म्हणून कोणाच्या लक्षात नाहीस.

ही कविता सादर केली.

यासोबतच कवयित्री पूर्वा, कवी विजय पांचाळ, विनायक दास, विनोद सिनकर, हर्षवर्धन दीक्षित, सुशील देशमाने, अजय त्रिभुवन, श्री शिखरे, पंडित वराडे इत्यादी कवींनी आपापल्या दर्जेदार कवितांनी मैफल जिंकली. प्रा.प्रवीण बोबडे ह्यांनी हिरवा निसर्ग हा भवतीने, मियां मल्हार रागातली चीज, पाऊस दाटलेला, रिम झीम गिरे सावन, श्रावणासारखे, बेधुंद, इत्यादी गीते गायली त्यास रसिकांची विशेष दाद मिळाली. सूत्र संचालन गिरीश जोशी यांनी अत्यंत काव्यात्मकपणे केले. मैफलीच्या यशस्वितेसाठी प्रशांत नानकर, गिरीश जोशी ह्यांनी श्रम घेतले.

# महिलांमध्ये कर्करोगाविषयी जनजागृतीसाठी ‘संजीवनी अभियान’

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई –** हिंगोली जिल्ह्यातील ‘संजीवनी अभियान’ हे आरोग्यविषयक नवचैतन्य निर्माण करणारे ठरत असून कर्करोगावरील लढ्यात एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे. हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या संकल्पनेतून महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०२५ रोजी संजीवनी अभियाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला होता. महिलांमध्ये कर्करोगाविषयी जनजागृती निर्माण करणे, तसेच कर्करोगाचे लवकर निदान व वेळेत उपचार उपलब्ध करून देणे, हा या अभियानाचा उद्देश आहे.

हिंगोली जिल्ह्यात अभियानाच्या पहिल्या टप्प्यात आशा सेविकांमार्फत घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले. यासाठी जिल्हास्तरावरून महिलांच्या आरोग्य समस्या व कर्करोगाची प्राथमिक लक्षणे लक्षात घेऊन विशेष प्रश्नावली तयार करण्यात आली होती. या सर्वेक्षणामध्ये गर्भाशयमुख, स्तन आणि मुख कर्करोग यासारख्या प्रमुख कर्करोग प्रकारांसाठी संशयित रुग्णांची ओळख पटविण्याकरिता सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणामध्ये कर्करोग सदृश, बुरशीजन्य, विषाणूजन्य आणि जिवाणूजन्य लक्षणे असणाऱ्या व इतर समस्या असणारे महिला व पुरुष असे एकूण १४,५४२ व्यक्ती संशयित म्हणून नोंदविण्यात आले. यात ७,९११ महिला गर्भाशयमुख कर्करोगासाठी, २,६९८ महिला स्तन कर्करोगासाठी व ३,९३३ स्त्री-पुरुष मुख कर्करोगासाठी संशयित आढळले.

पुढील टप्प्यात या संशयित रुग्णांची सखोल तपासणी करण्यात आली. गर्भाशयमुख कर्करोग संदर्भात एकूण ७,४३१ महिलांची व्हिज्युअल इन्स्पेक्शन विथ ॲसेटिक ॲसिड चाचणी करण्यात आली. त्यापैकी ६५९ महिलांमध्ये व्हिआयए पॉझिटिव्ह निदर्शनास आले तर ६,७७२ महिलांची व्हिआयए तपासणी अहवाल निगेटिव्ह आला असून त्यांना स्थानिक बुरशीजन्य जंतू संसर्ग झाल्यामुळे वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत औषधोपचार करण्यात आले.

आजमितीस ६५९ महिला गर्भाशयमुख कर्करोग संशयित असून त्यापैकी ४२७ महिलांची गर्भाशयमुखाच्या कर्करोगासाठी तपासणी आणि ७३ महिलांची बायोप्सी तपासणी स्त्रीरोग तज्ज्ञांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या तपासण्यांमध्ये आजअखेर ४ महिलांमध्ये गर्भाशयमुख कर्करोगाचे निदान झाले आहे.



## इंदापूरी निखारे

### सुखाची अपेक्षा....



ज्योतिर्मय साहित्य

वाड्याच्या बाहेर धन्याचा मित्र रम्या मोठमोठ्याने बोंब मारत होता. धन्याच्या बापाने त्यापेक्षा जोरात खेकसून ओरडला. ए रम्या कशाला बोंबलत आहेस रे सकाळी सकाळी. तस नाही अण्णा, कोठे गेला आहे?

शेतावर गेलायं, येईल थोड्या वेळात. काय झाले?

आता अण्णांना सांगावे का नको अशा विचारात असतांनाच अण्णांनी परत विचारले काय झाले रम्या? तो म्हणाला मला काही माहित नाही पण शाळेतले सगळे मास्तर, बाया जमल्या आहेत आणि मला पाहताच मुख्याध्यापक सरांनी बोलावले आणि म्हणाले ताबडतोब धन्याला शाळेत घेऊन ये म्हणून!

अण्णानी विचारले, काय लफडे केले त्याने? तुला माहित असेल ना! नाही ओ अण्णा!पण त्याला बोलावले आणि तुम्हाला पण बोलावले. अण्णा म्हणाले तू धन्याला घेऊन ये शेतावरून, मी जातो शाळेत. आणि धन्याला सांग काही घाबरू नको!बिनधास्त ये शाळेत, काही लफडं केलं असेल तरी ये...

रम्या वेगाने शेताकडे निघतो तर वाटेतच भेट होते. रम्या म्हणतो काय भानगड केली रे? सगळे मास्तर बाया शाळेत जमले आणि धन्या तुझी वाट पहात आहे. अण्णा गेले पुढे, त्यांना पण बोलावले. ए आपण काहीपण केले नाही! पाहू रे काय होईल ते...

अण्णांना शाळेत पोहोचताच अतिशय आदराने ऑफिस मध्ये नेले, त्यांना सर्व शिक्षक, शिक्षिका विनम्र अभिवादन करत होते. अण्णा तुम्ही बसा थोडी गडबड आहे, काही लागले तर माझ्या टेबलवर असणारी बेल वाजवा, मुख्याध्यापक सांगत होते. अण्णांना काही कळेना की नक्की काय भानगड आहे ते...

धन्या आणि रम्याला येतांना एका गुरुजींनी पाहिले आणि अचानक सर्वत्र आनंदाचे वातावरण शाळेत!स्वतः मुख्याध्यापक हार आणि पुष्पगुच्छ घेऊन धन्याचे स्वागत. सगळे जण त्याचे अभिनंदन करत होते. त्याला स्टेजवर मध्यभागी बसवले आणि अण्णांना पण... मुख्याध्याकानी बोलायला सुरुवात केली. आपल्या शाळेतील धनंजय यानी बोर्डाच्या परीक्षेत जिल्ह्यात पहिला तर राज्यात नववा येऊन शाळेचे आणि जिल्ह्याचे नाव खूप मोठे केले त्याला पुढील शिक्षणासाठी खूप खूप शुभेच्छा, अनेकांची भाषणे वगैरे वगैरे...

धन्याला एका चॅनेलच्या पत्रकाराने विचारले पुढे आपण काय शिकणार? तर तो म्हणाला मी आता शहरात कॉलेजमध्ये जाणार आणि बी.ए. करणार... त्याचा मोठा भाऊ इंजिनियर झाला होता, त्यांनी ते बोललेले ऐकले आणि त्याला म्हणाला ये धन्या तू डॉक्टर व्हायचे समजले का... पुढे तो यशस्वी डॉक्टर झाला, लग्न पण डॉक्टर मुलीशी झाले... आई खूपच आनंदी! एक मुलगा इंजिनियर तर दुसरा डॉक्टर... असेच एकदा सगळे घरचे गप्पा मारत बसलेले असतांना कोणीतरी म्हणाले काय भाग्यवान अण्णा तुम्ही दोघे! तसे अण्णा म्हणाले खरं तर धन्या नापास व्हावा असेच वाटायचे... म्हणजे तो गावाकडे राहील आणि शेती पण सांभाळेल. मला वाटलंच नव्हते की धन्या एव्हढा हुशार आहे...

आता काळजी एव्हढीच वाटते ती एव्हढया मोठ्या शेतीची...

https://jyotirmaysahitya.com

ही लिंक उघडेल साहित्याचे दार

॥ज्योतिर्मय॥
साहित्याचे विद्यापीठ

॥ज्योतिर्मय॥
साहित्याचे विद्यापीठ



आठवणीतले बालपण

मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर

- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.


# यशपाल सिंह यांचे स्वातंत्र्यलढ्यात केलेले कार्य असामान्य

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

सुखदेव त्यावेळी अन्नसत्याग्रह करीत होते. संयुक्त प्रांतातील कार्यकर्त्यांशी संबंध जोडण्याचे सूत्र म्हणून प्रभात या गुप्त नावाने वावरणाऱ्या शिववर्माचा पत्ता यशपाल यांना सुखदेव यांनी सांगितला. शेवटी निराश झालेल्या अज्ञातवासातील यशपालने भगवतीचरण बोहरा यांना गाठले. यशपाल यांनी बॉम्ब तयार करण्याचे संशोधन जे केले होते ते भगवतीचरण यांना दाखविले. कलकत्त्याच्या पुढाऱ्यांशी गुढतेमुळे जमण्यासारखे नाही असे पाहून दोघेही आपल्या कार्यक्षेत्रात आले. त्यांनी बॉम्बचा उपयोग जम्मू येथे करून पाहिला पण मोठा धडाका होऊन उपयोग न झाल्याने यशपाल यांनी रोहतक येथे राहून अडाणी नोकराच्या वेषात बॉम्ब तयार करण्यात यश मिळविले. देशातील सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी व्हाइसरॉय त्यालाच त्याच्या गाडीसहीत बॉम्बस्फोटने उडवून ख्रिस्तवासी करण्याची कल्पना निश्चित करण्यात आली. यशपाल यांनी नियत दिनांकाला विजेच्या साह्याने धडधडत दिल्लीला जाणाऱ्या व्हाईसरॉय आयर्विन यांच्या रेल्वे गाडीवर बॉम्ब फेकलाच. हा बॉम्ब व्हॉइसरॉयची गाडी येणाऱ्या रूळाखाली गाडलेला होता. विजेची तार त्याला जोडून ती रेल्वेलाइनपासून २०० यार्ड अंतरावर एका बॅटरीशी जोडलेली होती. नजिमुद्दीन स्टेशनच्या पलीकडे गाडी जाताच स्विच दाबण्यांत आला. तोफेसारखा प्रचंड आवाज होऊन स्फोट झाला. पण व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन हे दुसऱ्या डब्यात असल्याने वाचले. त्यांच्या स्पेशल जेवणाच्या डब्याखाली बॉंब उडाला आणि डबा हवेत उडून त्याच्या ठिकऱ्या उडाल्या. त्या दिवशी धुके होते म्हणूनच व्हाइसरॉय वाचले, नाहीतर बॉम्बस्फोट इंजिनच्या खाली करून संपूर्ण गाडी उडून देता आली असती. इंग्रज शासन हादरले.

यशपाल सिंह चंद्रशेखर आझाद यांच्यानंतर हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेनेचे सेनापती झाल्यानंतर त्यांनी स्वतःच्या नावाने भारतभर घोषणापत्रक जाहीर केले. त्यात ते म्हणतात....'' हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लीकन आर्मीचे सामर्थ्य ठिकठिकाणी विखुरलेल्या काही सशस्त्र तरुणांच्या टोळीतच नाही तर स्वदेशातील ज्या कोट्यावधी लोकांच्या हृदयात इंग्रजी राजसत्तेच्या अत्याचार व लांछनाविरुद्ध आग भडकलेली आहे व स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याची शक्ति विद्यमान आहे, त्या सर्वात आहे. स्वदेशाचे शत्रू असलेल्या शत्रूची सेवा करणे व त्याला सहाय्य करणे या गोष्टीला कर्तव्य समजणे हा अत्यंत मोठा देशद्रोह आहे. केवळ आपले पोट जाळण्यासाठी असा देशद्रोह करणाऱ्या मनुष्याला शिक्षा देण्याचा अधिकार प्रत्येक स्वदेशभक्ताला आहे. आमचे साध्य स्वकीय व परकीय शोषणवाद नष्ट करणे हा आहे. परिश्रम करणाऱ्या सर्वांना आत्मनिर्णयाचा अधिकार प्राप्त करून देण्याचा आमचा उद्देश आहे. अशी एक व्यवस्था आम्ही उत्पन्न करू इच्छितो की जेथे सर्व स्त्री-पुरुषांना समान अधिकाराने आपले वेतन मिळविण्याची, विकास करण्याची व आपल्या परिश्रमांचे पूर्ण फळ प्राप्त करून घेण्याची संधी असेल.'' एका बाजूला सरकारच्या वतीने यशपालचा फोटो देऊन सहस्त्रावधी रूपयांचे त्याला पकडून देण्याविषयी पारितोषिक लिहिलेला जाहीरनामा लटकत होता, तर दुसरीकडे यशपालचे हे घोषणापत्रक लटकत होते.



२३ जाने. १९३२ रोजी सकाळी साडेचार वाजता तुफान मेलने यशपाल सिंह अलाहाबादला आले. या स्टेशनवर गुप्त हेरांनी त्यांना ओळखले व त्यांचा पाठलाग करीत पोलीस सुपरिंटेंडेट डी. पिल्डीच यांनी निवासस्थानाला वेढा देत त्यांना आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले. यशपाल यांच्या अटकेचे महत्व इतके मोठे होते कि, सम्राटाचे खास पदक पिल्डीच यांना देण्यात आले. बॅरिस्टर जाफरअल्लींची परित्यक्ता आयरिश पत्नी सावित्रीदेवी यांच्याकडे ते उतरले होते. त्यांनाही खटला चालून ५ वर्षाची शिक्षा झाली. यशपाल सिंह यांना १४ वर्षाची शिक्षा झाली. यशपाल यांच्या सहकारी श्रीमती प्रकाशवती कपूर यांनी दिनांक २० ऑगस्ट १९३६ रोजी यशपाल यांच्याशी ते तुरुंगात असतांनाच त्यांच्याशी नोंदणीपध्दतीने विवाह केला. वस्तुतः प्रकाशवती व यशपाल यांचा प्रेमविवाह यापूर्वीच झालेला होता.

यशपाल सिंह जेलमध्ये असतानाच कथा लिहीत होते. या कथा स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा देणाऱ्या वेगवेगळ्या ठिकाणी प्रसिद्ध होत होत्या. जेलमधून त्यांची सुटका झाल्यानंतर पिंजडे की उडान या नावाने पहिला कथासंग्रह प्रकाशित केला. काही काळ त्यांनी कर्मयोगी पत्रिकेसाठी काम केले. त्यानंतर विप्लव नावाचे स्वतः पत्रक प्रकाशित करण्यास सुरवात केली. इंग्रज शासनाच्या दबावाने हे पत्रक बंद करण्यात आले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पुन्हा हे पत्रक प्रकाशित करण्यास सुरवात केली. १९४१ मध्ये त्यांनी कार्यालय नावाची प्रकाशन संस्था निर्माण केली. त्यांची पहिली कादंबरी दादा कॉमरेड १९४१ मध्ये तर देशद्रोही कादंबरी १९४३ मध्ये प्रकाशित झाली. १९४९ मध्ये उत्तर प्रदेश सरकारने कम्युनिस्टांची धोरणे यशपाल सिंह राबवितात म्हणून त्यांना अटक केली. पण लोकांच्या दबावामुळे त्यांना सोडून द्यावे लागले. प्रेमचंद्र यांची परंपरा पुढे नेणाऱ्या यशपाल सिंह या साहित्यिकाने शहरी समाजातील सर्वसामान्यांना केंद्रस्थानी ठेऊन लिखाण केले. भगतसिंग, सुखदेव, चंद्रशेखर आझाद यांच्यासह इतरांबरोबर काम करीत संघटनेचे सेनापती होऊन त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात केलेले कार्य असामान्य. त्यांचे जीवन अनेक रोमहर्षक घटनांनी भरलेले आहे. त्यांच्या जीवनाचे काव्य प्रेरणादायी आहे. सिंहावलोकन या नांवाखाली त्यांनी हिंदी भाषेत आपली त्रिखंडात्मक आत्मकथा लिहिलेली आहे. ज्यामुळे स्वातंत्र्यलढ्यातील समर्पण करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांची कहाणी आपल्या पर्यंत सहजपणे सविस्तर पोहोचली.

# बालकांच्या अंर्तमनाचा ठाव घेणारा बालकाव्यसंग्रह

**ज्योतिर्मय साहित्य**

आदरणीय बालकवीवर्य प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांच्या ''छान छान गाणी'' ह्या काव्यसंग्रहाचे परिक्षण करतांना मी कवियत्री विजयश्री, धुळे स्वत:स धन्य समजते.. कारण नवोदित कवियत्री असल्यावर त्यांच्या काव्यसंग्रहाचं परिक्षण माझ्या साठी लहान तोंडी मोठा घास घेण्यासारखं आहे...


आदरणीय गुरूजींना विविध सामाजिक संस्थानी जीवनगौरव पुरस्कारसकट विविध पुरस्कांनी गौरविले आहे यातच त्यांच्या सामजिक बांधिलकीचा परिचय होतो

लहान बालकांवर संस्कार करत असताना गुरूजी त्यांच्यात लहान होवून समरस झाल्याचा प्रत्यय त्यांच्या कविता वाचल्यावर येतो.

पुस्तकाच्या मुखपृष्ठावर कासव, मोर, वाघ, सिंह, हत्तीचा मुखवटा लावलेली मानवी आकृतीने बालमनाला भावेल असच साजेसं हे पुस्तक आहे ..

वडिलांचा फोटो त्यांच्यातल्या पितृभक्तीची ओळख करून देतात.

बालकवितांचा अभ्यास करताना त्यांची बालमनावर संस्कार करण्याची तळमळ दिसून येते. पूर्वीच्या पिढीतील खेळांची ओळख करून देत नविन बैठे खेळ मोबाईल गेम्सवरही आधुनिक काव्य लिहिताना त्यांची काळासोबतची सजगता लक्षात येते.




समाजातील सर्व कामे करणाऱ्या मंडळी अन आधुनिक रोबोटही मुलांना काव्यातून ओळख करुन दिलेला आहे.

नविन पिढितील चिमुकल्यांना आज दूरावलेलं संस्कारी ''आजीचं घर'', ड्रोन अन मोबाईलने आज सानथोरांचं व्यापलेलं विश्व बाहूली, प्राणी, पक्षी,वर्तमानपत्रे, तारे आठवड्यातील वारांची वारी, मेट्रो अशा विविध विषयांवरील अष्टपैलू लेखन त्यांच्यातील सजग शब्दकुबेराचं दर्शन घडवितो...

काळानुरूप जादूई चिराग बालमनाला भावला नाही तर नवल. आई मला छोटिशी बंदूक देना म्हणणारं बालमन आज ''जादूई चिराग'' मागतयं. यातून पिढीतलं अंतर, समस्या कशा बदलल्या आहेत तेही जाणवतं आणि वारीचाही उल्लेख अध्यात्माची रुजुवात बालमनात करतोय. आणि ''साबण साबण '' म्हणत आदरणीय गुरुजींनी फक्त देह स्वच्छ करणाऱ्या साबणास आणि वाचकास मनाच्या शुद्धतेचं, स्वच्छतेचं अन निर्मळतेचंही महत्त्व महत्वाचं आहे.

कारण ''मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण. '' म्हणून बालमानावर संस्कार करणाऱ्या आणि पिढींमधील जुन्या नव्याचा सुवर्णमध्य साधणाऱ्या कवितांचा हा संग्रह यथोचित चित्रांसह अतिशय सुंदर आहे...

गुरुजींनी मुलांचे मनोरंजन करत ईश्वराशी आपलं नातं आपसूकच जोडलं आहे... आदरणीय गुरुजींच्या कार्यास नमन आणि खूप खूप शुभेच्छा.. असेच भरभरून कार्य ईश्वर त्यांच्याकडून करून घेवो, ही सदिच्छा




बालकाव्यसंग्रहाचे नाव:- बालमित्रांची छान छान गाणी

कवी:- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर ( रमाईसुत)


प्रकाशक:- हृदय प्रकाशन पन्हाळा, कोल्हापूर पृष्ठसंख्या:-१२० किंमत:- रू.१६०

कवींचा संपर्क क्रमांक:-९८२३११३५९४

# अमृता सुभाष - सोनाली कुलकर्णी पहिल्यांदाच झळकणार एकत्र

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी चित्रपटसृष्टीत आजवर आपल्या सशक्त अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणाऱ्या अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि अमृता सुभाष आता प्रथमच एकत्र मोठ्या पडद्यावर झळकणार आहेत. 'परिणती बदल स्वतःसाठी' हा त्यांचा आगामी चित्रपट येत्या १ ऑगस्ट २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अक्षय बाळसराफ दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती पराग मेहता आणि हर्ष नरूला यांनी केली आहे.




या चित्रपटाच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये दोन स्त्रिया दिसत असून एक रंगीबेरंगी पारंपरिक पोशाखात, चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि एक वेगळा आकर्षक बाणेदारपणा तर दुसरी साधेपणात गुंतलेली, कुशीत विसावलेली. त्यांच्या वेगवेगळ्या पार्श्वभूमी आणि भावविश्वाचा संगम चित्रपटाच्या आशयाची झलक देतो. सन्मान, अस्तित्व आणि मुक्ततेसाठी लढणाऱ्या दोन स्त्रियांची ही कहाणी आहे, त्यांच्या लढ्याची कारणं वेगळी आहेत, परंतु दोघींचा उद्देश एकच आहे, तो म्हणजे स्वतःसाठी बदल घडवणे.

या चित्रपटाविषयी लेखक-दिग्दर्शक अक्षय बाळसराफ म्हणतात, परिणती या चित्रपटात मी अशा दोन स्त्रियांना एकत्र आणलं आहे, ज्यांची एका वळणावर मैत्री होते आणि त्यातून त्यांचे आयुष्य बदलते. सोनाली आणि अमृता यांनी या भूमिकांमध्ये जीव ओतला आहे. 'परिणती' ही त्यांच्या वाटचालीची, बंडाची, आणि स्वतःला सापडण्याची कहाणी आहे. 'परिणती' प्रेक्षकांना केवळ मनोरंजनच देणार नाही, तर विचारही करण्यास भाग पाडेल.''

# छायाचित्र... फोटो...

**ज्योतिर्मय साहित्य**

माझे ज्या खेडेगावात बालपण गेले तिथे सुरुवातीच्या काळात फोटोग्राफरच नव्हता. मी १२ वी ला गेल्यावर एकमेव फोटोग्राफर गावात राहायला आला. अर्थात त्या काळी फोटो अगदी विशेष समारंभात ठराविक आणि काळे/पांढरे काढले जायचे. माझा पहिला फोटो साधारण मी पाच वर्षाची असताना गावात एक फोटोग्राफर आला म्हणून एका बंद दुकानाच्या पायरीवर काढलेला होता.भरपूर तेल लावून घातलेल्या दोन वर बांधलेल्या वेण्या आणि फुलांचे चित्र असलेले परकर पोलके. अशा अवतारातला फोटो खास पुठ्ठ्यावर चिकटवून घेतलेला होता.

नंतर मला माझे आवडणारे फोटो म्हणजे मोठ्या बहिणीच्या लग्नातले. साधारण त्यावेळी अकरा वर्षाची होते. आताच्या मुलांच्या मानाने त्यावेळच्या मुला/मुलींचा बुद्ध्यांक खूप कमी होता.. (माझे निरागस बालपण तर अगदी लग्न होईपर्यंत टिकून होते) त्यामुळे आहे त्या अवतारात बहिणीला चिकटून बसलेले ते दोन/ तीन काळे पांढरे फोटो खूप आवडत असत..पण दुर्दैवाने २०१५ साली मोठा महापूर आला. भावाच्या घरात इचलकरंजीला पाणी शिरले आणि त्यामध्ये हे जुने अल्बम पूर्ण भिजून गेले.

दुसऱ्या बहिणीचे मी १२ विला असताना लग्न झाले. त्यावेळी रंगीत फोटो आले होते पण एकत्र काढलेल्या एका फोटोत छोटीशी कोपऱ्यात मी दिसत होते. नंतरचे फोटो माझाच साखरपुडा/ लग्न आणि इतर अनेक समारंभाचे. पण प्रत्येक फोटोत सावधान पोझिशन आणि घट्ट ओठ बंद केलेला गंभीर चेहरा. मुले मोठी झाल्यावर हे सगळे अल्बम काढून बघताना मला विचारत आई एकाही फोटोत तू हसली नाही आहेस. जगाचा भार डोक्यावर असल्यासारखा का चेहरा केला आहेस? त्याचे कारण म्हणजे फोटो काढणार म्हंटले की मला खूप दडपण येई.आपला चांगला फोटो येणारच नाही असे वाटे त्यामुळे कुठेही फोटो काढणार म्हंटले की मी नकार देत असे.




पण ही माझी भीती ऑफिसमध्ये इंटर्नशिप साठी आलेल्या अंजलीने पूर्ण घालविली.. ( ती आता .. आहे आणि नाशिक मध्ये आपला संसार, करियर करते आहे.आमचे मैत्र अजूनही तितकेच घट्ट आहे..) तिचा स्वभाव प्रचंड सकारात्मक आहे. त्या वेळी नुकते मोबाईल आले होते. ऑफिसच्या जेवणाच्या सुट्टीत आमचे ती फोटो काढायची मी सुरुवातीला नकार दिला तर म्हणायची मी काढलेला फोटो छानच येईल याची मला खात्री आहे. त्यामुळे तुमचा मी फोटो काढणारच.. तिच्या हट्टापुढे माझे काही चालत नसे पण तिच्यामुळे आपले बरे फोटो येतात हे मात्र पटले.

सेल्फी तर अजूनही मला नीट काढता येत नाही. पण फोटो एक सुंदर आठवणींच्या जगात घेऊन जातात हे मला तरी मनापासून पटते. (अर्थात अतिरेक नसावा हे मान्य आहे) माझा माझ्या तात्यांच्या बरोबर एकही एकटीचा फोटो नाही. एकदा अशीच पावसातून ऑफिस करून मी दमून भागून पावसात भिजत इचलकरंजीला आईला भेटायला गेले. आई दिवसभर माझी वाट बघत होती.गेल्यागेल्या तिच्या कुशीत अवतारातच शिरले..पण भाच्याने सहज त्याच्या मोबाईलवर आम्हां दोघींचा फोटो काढला ते एक / दोन फोटो मला प्राणप्रिय आहेत.

आता भाऊ मी त्याच्याबरोबर फोटो काढणार म्हंटल्यावर ओरडतो पण माझ्या हट्ट नाईलाजाने का होईना पुरवितो. त्यामुळे एकत्र कार्यक्रमाला जमल्यावर सगळ्यांच्या बरोबर मी नक्की फोटो काढून घेते ती माझी सुंदर आठवण ठेव असते.

सध्या माझे विश्व नातवंडांच्या भोवती फिरते आहे. त्यांचे फोटो, व्हिडिओ काढणे, बघणे याचा आनंद शब्दात न सांगता येणारा आहे हे मात्र नक्की..

ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
जगप्रसिद्ध, वर्ल्ड रेकॉर्डीस्ट, रंगचिकित्सक, वास्तुतज्ज्ञ, भारतीय प्रतिक शास्त्र, चिन्ह, आकार, धार्मिक आणि आध्यात्मिक विषयाचे अभ्यासक
डॉ गजानन समर्थ
उपाख्य (डॉ गजानन सिताराम शेपाळ)
यांची
'वास्तुशास्त्र पेंटींग' या विषयावरील अद्भुत माहिती
याच ठिकाणी, लवकरच..!!!
व्दारा एसव्हीएस कला प्रतिष्ठान,
संपर्क : 98 69 13 02 38

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559